।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला ✻ जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे ✻ शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ (विशेष अंक) ✻ पाने ४ ✻ मूल्य १ ₹ ✻ अंक ३० वा

## शेतकरी कामगार पक्षाच्या सरचिटणीस पदी भाई जयंत पाटील; डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांची पुरोगामी युवक संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष पदी निवड





सांगोला : भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे १९ वे अधिवेशन पंढरपुर नगरीत भाई संपतबापु पवार –पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये राजकीय ठराव संमत मांडुन त्यास एकमताने सहमती घेण्यात आली.तसेच काही प्रासंगिक ठरावही मांडुन त्यास सहमती घेण्यात आली.

सदर अधिवेशनामध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या व पक्षांतर्गत विविध आघाडयावर काम करणाऱ्या महत्त्वपुर्ण आशा पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या . शेतकरी कामगार पक्षांमध्ये असलेले महत्वाचे पद म्हणजे सरचिटणिस पद या पदावरती पुंन्हा भाई जयंत पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली व शेतकरी कामगार पक्षाचे महत्वाचे असलेले पद म्हणजे पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पद या पदावरती दुसऱ्यांदा डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली.

तसेच कोल्हापुरचे भाई संपतबापु पाटील यांचे चिरंजीव भाई क्रांतिसींह पवार –पाटील याची प्रदेश उपाध्यक्षपदी एकमताने निवड झाली. निवड झालेले पदाधिकारी पुरोगामी विचार राज्यभर पोहचवण्याचे काम करतील असा विश्वास निवड समितीने व्यक्त केला.येणाऱ्या विधानसभेला या निवडीचा फायदा शेतकरी कामगार पक्षाला होईल.भाई जयंत पाटील व भाई बाबासाहेब देशमुख यांच्या निवडीने शेतकरी कामगार पक्षात नवचैतन्य निर्माण झाले आहे असे प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी सांगितले.

## म्हैसाळ प्रकल्पातून कोरडा नदीवरील बंधारे, तलाव भरण्यात येणार- आ.शहाजीबापू पाटील

### गळवेवाडी ते वाढेगाव पर्यंतचे १५ बंधारे तसेच नराळे, घेरडी, हंगीरगे तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यात येणार



सांगोला : कोयना आणि वारणा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने कृष्णा नदीतून वाहून जाणारे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाटबंधारे विभागाने म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू केले आहे. आठ दिवसांत म्हैसाळ प्रकल्पाच्या जत मुख्य कालव्यातून थेट बंदिस्त नलिकेद्वारे सांगोला तालुक्यातील गळवेवाडी पासून वाढेगाव पर्यंतचे १५ बंधारे तसेच नराळे, घेरडी व हंगीरगे असे तीन तलाव पूर्ण क्षमतेने भरुन देण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

यामुळे गळवेवाडी, सोनंद, आगलावेवाडी, जवळा, कडलास, बुरुंगेवाडी, आलेगाव, मेडशिंगी व वाढेगाव या नऊ गावांना पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा लाभ होणार आहे. कृष्णा आणि वारणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याने पूरस्थिती निर्माण झाली आहे. कृष्णा नदीतून वाहून जाणारे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाटबंधारे विभागाने म्हैसाळ योजनेचे पंप सुरू केले आहेत. म्हैसाळ योजनेचे पाणी जत आणि सांगोला तालुक्यासाठी सोडण्यात आले आहे. दुष्काळी भागाला संजीवनी ठरणारी योजना म्हणून म्हैसाळ योजनेची ओळख आहे. या योजनेच्या माध्यमातून पुराचे पाणी दुष्काळी भागाला देण्यासाठी म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे.

जत, सांगोला भागातील खरीप हंगामातील पिकांना जीवदान देण्यासाठी तसेच जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी म्हैसाळ योजनेतून पाणी सोडले असून जसजशी मागणी वाढेल तसे जादा पंप सुरु करणार असल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

## सांगोल्यात ११ ऑगस्ट रोजी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन

### नोकरी महोत्सवात ६० नामवंत कंपन्या सहभागी होणार

सांगोला : राजर्षी शाहू महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ, चिकमहुद यांच्या वतीने तसेच पाणीदार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून सांगोल्यात रविवार ११ ऑगस्ट रोजी इयत्ता पाचवी ते पदवी पर्यंतचे शिक्षण झालेल्या बेरोजगार तरुणांसाठी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. या नोकरी महोत्सवात ६० नामवंत कंपन्या सहभागी होणार आहेत.

रोजगार निर्मिती, सक्षम कुशल रोजगारक्षम युवा निर्मितीसाठी राजर्षी शाहू महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ चिकमहूद यांच्या वतीने तसेच पाणीदार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून नोकरी आपल्या दारी अंतर्गत इयत्ता पाचवी ते पदवी पर्यंतचे शिक्षण झालेल्या बेरोजगार तरुणांसाठी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


रविवार ११ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत हर्षदा लॉन्स, मिरज रोड सांगोला या ठिकाणी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान नोकरी पूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार ८ ऑगस्ट रोजी स्वेरी इंजीनियरिंग कॉलेज गोपाळपूर, कर्मयोगी कॉलेज शेळवे, शुक्रवार ९ ऑगस्ट रोजी फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज सांगोला, सह्याद्री फार्मसी कॉलेज मेथवडे तर शनिवार १० ऑगस्ट रोजी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज सांगोला व दीपकआबा साळुंखे पाटील कॉलेज कोळा या ठिकाणी नोकरीपूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबिर संपन्न होणार आहे. या नोकरी महोत्सवात बजाज ऑटो, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, झोमॅटो, अक्सिस बँक, डॉ.रेड्डीज फाऊंडेशन, इक्वीटास स्मॉल फायनान्स बँक, फुकोकू इंडिया प्रा.लि., क्विझ कॉर्प लि., जिनियस ग्लोबल, पॉलीबाँड इंडिया लि., रॉयल इन्फोटेक, यशस्वी ग्रुप, साई श्रद्धा इंटरप्रायजेस, युवाशक्ती फाऊंडेशन, एक्साईड बॅटरी, युनो मिंडा लि., इलेक्ट्रो टेक्नॉलॉजी लि., युनीकेअर हेल्थ केअर, सुमित फॅसिलिटीज लि., डी.एम.सी .फिनिशिंग प्रा.लि. यासह मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिकल, बँकिंग, सेल्स, रिटेल इंडस्ट्रीज, हॉटेल इंडस्ट्रीज, फार्मा, सिक्युरिटी, मार्केटिंग, ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील नामवंत ६० कंपन्या सहभागी होणार आहेत. गरजू युवकांनी या नोकरी महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांना या नोकरी महोत्सवाच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.




नोकरीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना क्यू आर कोड स्कॅन करावा. किंवा https://maharashtrajobfair.com/shahajibapupatil या वेब पेजवरील फॉर्म भरून ऑनलाईन नोंदणी करावी. ज्या इच्छुकांना ऑफलाईन नोदणी करावयाची आहे, त्यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयातील फॉर्म भरून द्यावेत असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विनम्र अभिवादन !!



स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख

सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
**स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख**
यांना जयंती निमित्त
**विनम्र अभिवादन**

॥ अभिवादक ॥

**डॉ. लवटे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल अॅन्ड ट्रॉमा केअर युनिट**

फ्रॅक्चर आणि अॅक्सीडेंट हॉस्पिटल

सांगोल्यातील एकमेव NABH मानांकित हॉस्पिटल

**डॉ.सुनिल लवटे** M.B.B.S.D.Ortho.(अस्थिरोगतज्ञ)

**डॉ.सौ.प्रज्ञा लवटे** M.B.B.S.D.A (भूलतज्ञ)

पोलिस लाईन शेजारी,पंढरपूर रोड सांगोला फोन-०२१८७/२२२३३३


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांचे कार्यालय** वेब-www.mahapwd.com

**निविदा सूचना क्रमांक /१०/२०२३-२०२४**

**बी-१ निविदा**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत असलेल्या कंत्राटदाराकडून कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा निविदा रिं वि व्दारे मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, ४१३३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ०७/०८/२०२४ (वेळ सकाळी ११.०० वा. पासून) ते दि. १४/०८/२०२४ (सायं. १७.३० पर्यंत) |
| निविदापूर्व बैठक | :- | ----------------निरंक------------------- |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | दि. १६/०८/२०२४ सकाळी ११.०० वा. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांचे कार्यालयात |

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर ४१३३ ०४ कार्यालयात सुचना फलक

सही/-
(अमित निमकर)
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर**

**जिमाका /सो/जाहि/८३/२०२४-२५**



# निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा....

साप्ताहिक **माणदेश वार्ता**



# विनम्र अभिवादन !!!

आशिर्वाद



स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख

सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते
**स्वर्गीय मा. आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख**
यांच्या ९७ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

॥ अभिवादक ॥

**सांगोला अर्बन को-ऑप.बँक लि.सांगोला**

मुख्यालय:२४२९/५अ व ब, रेल्वे गेट जवळ, मिरज रोड
सांगोला ४१३ ३०७ जि.सोलापूर. फोन (०२१८७) २२०६७०,२२११७०,२२१३७०
Website :sangolaurbabank.com Email:sangolaurban@gmail.com

शाखा:मुख्य शाखा सांगोला,अकलुज,महुद बु।।,पंढरपूर,सांगोला शहर,कमलापुर,आटपाडी,माढा

**डॉ.प्र.ए.माळी**(संस्थापक चेअरमन) **सीए के.एस.माळी**(चेअरमन,बोर्ड ऑफ मॅनेजमेंट)
**राजन द.चोथे** (व्हा.चेअरमन) **सुभाष कृ.वेळापुरे** (मुख्य कार्यकारी अधिकारी)
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग



माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४१ वे अंक-३७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# दोन दिवसात माण नदीत पाणी सोडण्यात येणार- डॉ.बाबासाहेब देशमुख

## पुणे येथील सिंचन भवन येथे बैठक संपन्न

सांगोला : संपुर्ण राज्यात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे पुरसदृश्य परिस्थिती तयार झाली असून धरणाच्या पाणीसाठ्यातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात महापुराची परिस्थिती तयार झाली असल्यामुळे टेंभू उपसा सिंचन योजनेतून ओव्हरफ्लोचे पाणी दोन दिवसात माण नदी सोडण्यात येणार असल्याची माहिती शेकाप नेते डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली. विस्तारीत टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाविषयी पुणे येथील सिंचन भवन येथे बैठक संपन्न झाली. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते–पाटील, डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासह सिंचन भवनमधील अधिकारी, शेतकरी बांधव उपस्थित होते.

या बैठकीमध्ये राज्यात पुरसदृश्य परिस्थिती तयार झाल्यामुळे सर्व उपसा सिंचन योजना त्वरीत सुरु करुन ओव्हरफ्लोचे पाणी टेंभू उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून दुष्काळी भागात सोडावे, अशी आग्रही मागणी डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी लावून धरली होती. डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या आग्रही मागणीमुळे टेंभू ओव्हरफ्लोचे पाणी एक दोन दिवसात दुष्काळी भागात सोडण्यात येणार असल्यामुळे माण नदीत पाणी येणार आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात शेतातील जळून जाणारी उभी पिके वाचणार आहेत. पाणी सोडण्यात येणार असल्यामुळे शेतकरी बांधवांना दिलासा मिळणार आहे. तसेच राज्यमध्ये जुनोनी येथील पाणीवापर संस्थेचा नावलौकीक आहे. प्रत्येक मोटारीला मीटर असताना व वेळेवर पाणी पट्टी भरली जात असताना सुध्दा कालवे फोडले म्हणून जुनोनी भागात राजकीय दबावापोटी चुकीच्या पध्दतीने गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदरचे गुन्हे मागे घेण्याची मागणीही डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केली. यावेळी संबंधित गुन्हे मागे घेऊ असे आश्वासन अधिकाऱ्याकडून देण्यात आले. त्याचप्रमाणे तसेच उजनी धरण क्षेत्रात जोरदार पाऊस सुरु आहे. पावसामुळे सद्य परिस्थितीत १०० टक्के पाणी साठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे उजनी धरणाच्या ओव्हरफ्लो पाण्यातून पंढरपूर तालुक्यातील उपरी, भंडीशेगाव, पळशी, सुपली, वाडीकुरोली, शेळवे, केसकरवाडी, बंधारे व साठवण तलाव पुर्ण क्षमतेने भरुन मिळावेत, त्याचप्रमाणे सोनके तलाव सुद्धा भरून देण्याची मागणी यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केली. त्यास संबंधित अधिकाऱ्याकडून होकार मिळाला असल्यामुळे उपरी, भंडीशेगाव, पळशी, सुपली, वाडीकुरोली, शेळवे, केसकरवाडी, बंधारा व सोनके तलाव लवकरच भरुन देण्यात येणार असल्याचे डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

विस्तारीत टेंभू योजनेमध्ये बुध्देहाळ, चोपडी, हातीद, पाचेगाव (खु), सोमेवाडी, बंडगरवाडी, अजनाळे/लिगाडेवाडी, चिणके (अंशत):, खवासपूर, लोटेवाडी(जुनी व नवी), मंगेवाडी (अंशत), सोनलवाडी, वझरे, डोंगरगाव, हणमंतगाव, हटकर मंगेवाडी, मानेगाव, काळूबाळूवाडी, गुणाप्पावाडी आदी गावांचा समावेश करुन या गावातील सिंचन योजनांची कामे लवकरच सुरु करण्यात येणार असल्याची माहिती डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

या बैठकीस अभयसिंह जगताप, बाबूराव गायकवाड, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, अरविंद पाटील, महेश नलवडे, हरिभाऊ पाटील, नारायण पाटील, ॲड.विशालदीप बाबर, दादा शिनगारे, गजेंद्र कोळेकर, निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन काही इतर लोक दबावाचे राजकारण करतील त्याला बळी पडून मनमानी पद्धतीने पाणी सोडू नये तसेच पाणी बंद करून नये. शेतकऱ्यांचा विचार करून पाणी वाटपाचे वर्षिक नियोजन करावे, अशी देखील सुचना खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी केली . रणजितसिंह देशमुख, अर्जुनसिंह मोहिते–पाटील, सुरेंद्र गुदगे, कविताताई म्हेत्रे, मनोज पोळ,सुभाष नरळे, मुख्य अभियंता श्री.गुणाले, कार्यकारी अभियंता श्री.राजन रेडीय्यार,श्री रासनकर,श्री.हरगुडे व लाभक्षेत्रातील प्रमुख नेतेमंडळी,नागरिक उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये नूतन संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख यांचा सत्कार संपन्न




सांगोला : सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला च्या संस्था अध्यक्षपदी डॉ.अनिकेत देशमुख यांची निवड झाल्याबद्दल या शिक्षण संकुलातील सर्व शिक्षकांमार्फत सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याचबरोबर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त शिक्षकांचाही सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांच्या शुभहस्ते नूतन संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

माजी प्राचार्य प्रा नामदेव कोळेकर व ज्येष्ठ शिक्षक नीलकंठ लिंगे यांचा सेवानिवृत्ती निमित्त नूतन संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख व संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्था सदस्य बबनराव जानकर, प्रा.डॉ. अशोकराव शिंदे, प्रा दीपक खटकाळे, प्रा जयंत जानकर, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोलाचे प्राचार्य प्रा.केशव माने, उपमुख्याध्यापक प्रा संजय शिंगाडे, उपप्राचार्य प्रा.संतोष जाधव, पर्यवेक्षक श्री तानाजी सूर्यगंध श्री दशरथ जाधव, श्री तातोबा इमडे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख यांनी शिक्षक एक उत्तम पिढी बनवू शकतो, सुसंस्कारित विद्यार्थी घडवून समाजामध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठी तयार करू शकतात. इथून पुढील काळामध्ये या संस्थेमध्ये जास्तीत जास्त वेळ देणार असल्याचे सांगितले. संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांनी की, या संस्थेची स्थापना तालुक्यातील गोरगरीब, सर्वसामान्य, कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या हेतूने, स्व. डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या प्रेरणेने झाली. या वेलरुपी शिक्षण संस्थेचे वटवृक्षात रूपांतर झाले असून आज या संस्थेमध्ये पाच हजारहून अधिक विद्यार्थी शिकत असल्याचे सांगितले.

यावेळी प्रा. इंदिरा येडगे, प्रा.चंद्रकांत इंगळे, प्रा.नामदेव कोळेकर, निलकंठ लिंगे सर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. सौ.जुलेखा मुलाणी मॅडम व प्रा संतोष राजगुरू यांनी केले तर आभार संस्कृतिक विभाग प्रमुख प्रा मिलिंद पवार यांनी केले.


विनम्र अभिवादन !!



शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
शे.का. पक्षाचे जेष्ठ नेते आमचा स्वाभिमान
स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
|| अभिवादक ||
ॲड.संजीवकुमार शिंदे
माजी नगरसेवक,सांगोला नगरपरिषद,सांगोला
शिंदे परिवार,सांगोला




विनम्र अभिवादन !!!



स्वर्गीय मा.आ.डॉ.गणपतरावजी देशमुख
सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,ऋषितुल्य नेतृत्व,आमचा स्वाभिमान
स्वर्गीय मा.आ.भाई डॉ.गणपतरावजी देशमुख
यांच्या९७व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !!!
अभिवादक
दिशा ऑर्थोकेअर हॉस्पिटल,सांगोला
फ्रॅक्चर, ॲक्सीडेंट ट्रॉमा सर्जिकल
कडलास नाका, कॉलेज रोड, सांगोला
डॉ.सचिन गवळी M.B.B.S.D.Ortho.Mumbai (अस्थिरोगतज्ञ) मो. ९४२३२७६४४२



विनम्र अभिवादन !!



स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,
सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
|| अभिवादक ||
मा. श्री. गिरीषभाऊ नष्टे
चेअरमन, अजिंक्यतारा नागरी पतसंस्था मर्या.सांगोला
अजिंक्यतारा मल्टीकेअर हॉस्पिटल, डॉ. अजिंक्य नष्टे
अजिंक्य लॉज (राहण्याची उत्तम सोय)
अजिंक्य टायर्स, (एम. आर. एफ. चे अधिकृत विक्रेते)
पत्ता : एस. टी. स्टँड समोर, सांगोला
प्रोप्रा. निलेश नष्टे

# विनम्र अभिवादन !!

ऋषितुल्य नेतृत्व, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते

## स्व.मा.आ.भाई गणपतरावजी देशमुख

यांच्या ९७व्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !!!



स्व.आम.भाई गणपतरावजी देशमुख

चेअरमन, आर.डी.सी.सी.बँक



मा.आ.जयंतराव पाटील

**अभिवादक**

# दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

मुख्य कार्यालय: रिलायन्स पेट्रोल पंपा समोर, मु.पो.चेंदारे,

तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड ४०२ २०१.

फोन +९१ २१४१-२२४३१५, २२४३१६,

फॅक्स: +९१२१४१-२२४३१४

वेबसाईट: www.rdccbank.in ई मेल helpdesk@rdccbank.in